# शब्दवीणा

“आपल्या शब्दांनी इतरांच्या मनात वीणेचे स्वर उमटू द्या…”, हे वाचले आणि माझ्या मनात विचार आला की असे झाले तर किती छान….

२६ नोव्हेंबरला मुंबईत झालेल्या अतिरेकी हल्ल्यांनंतर खरंच सगळ्या संवेदना गोठल्यासारख्या झाल्या होत्या. असे नाही की आपल्या देशाला दहशतवादाचा हा पहिला धक्का होता.. या पूर्वी सुध्दा असे अनेक धक्के आपल्या जनतेने पचवले होते. पण सगळ्याचीच सवय झाल्यासारखी मनं सुध्दा दगडी बनली आहेत आता.

आपल्या शब्दसामर्थ्याने लोकांच्या थेट काळजाला भिडायचे…हा विचारच किती सुरेख-तरल ! वीणेच्या झंकाराची अनुभुती देत त्यांच्या ह्रदयांची तान छेडायची…., पण अवघड वाटतं आता सगळं, फारच अवघड !!!

गुणगुणण्याचा एके काळी
होता आम्हा छंद,
झाकलेले कान आता, आणि
ओठही आमुचे बंद !!

आश्वस्त होते मनही मागे
होती थोडी शांती,
उरले न काही आता..
फरफट नुसती अंती !!

मरणाचा हा खेळ रोजचा
जगण्याची होते दैना,
गोठून गेलेत सारे सूर, अन्
अबोल ही शब्दवीणा…

अबोल ही शब्दवीणा !!!!

नवीन वर्षाच्या आगमनाबरोबर आपल्या सगळ्यांच्या मनात घर करून राहिलेल्या “भिती व त्रागा” या भावनांनी पळ
काढावा आणि बाकी सर्व संवेदनांना जागं करत आपल्या आयुष्यांमध्ये नवा उत्साह आणि शांतीची वीणा झंकारावी...
एवढीच ईश्वरचरणी प्रार्थना.......

**© प्रीती देशपांडे**

www.meetipreeti.com